**कोकण विकास पॅकेजअंतर्गत सागरी जिल्यांमध्यें जिल्यांमध्यें मासेमारी जेट्टी व मुलभूत सुविधांची बांधकामे करण्यास मान्यता देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक-मत्स्यवि-२००९/प्र.क्र.१०३/पदुम-१४**
**मंत्रालय विस्तार,मुंबई-४०००३२.**
**दिनांकः-२६ ऑगस्ट,२००९.**

**प्रस्तावनाः-**

रत्नागिरी येथे दिनांक २४.६.२००९ रोजी सपन्न झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीतील मत्स्यव्यवसाय विकासाच्यादृष्टीने पाच सागरी जिल्हयांमध्ये ३० ठिकाणी मासेमारी जेट्टी व मूलभूत सुविधांची बांधकामे करण्याच्या दृष्टीने प्रस्तावास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार सादर जेट्टी बांधकामाची ठिकाणे निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः-**

या शासन निर्णयाअन्वये खालीलप्रमाणे केंद्र शासनाच्या अर्थसहाय्य योजनांतर्गत ३० मासेमारी जेट्टी बांधकामाची ठिकाणे निश्चित करण्यास मान्यता देण्यात येत आहेः-

| अ.क्र. | ठिकाण | अंदाजित खर्च (रु.कोटीत) |
|---|---|---|
| **जिल्हाःठाणे** | | |
| १ | वडराई | ०.४५ |
| २ | एडवण | ०.६५ |
| ३. | वसई | ४.५० |
| ४. | उत्तन (डायना) | १०.०० |
| ५. | सातपाटी | १.८० |
| ६. | घनसोली | ०.५० |
| | एकूण | १७.९० |

| **जिल्हा:बृहन्मुंबई** | | |
|---|---|---|
| १ | कफ परेड | ३.६५ |
| २ | दांडा (जेट्टीचा विस्तार) | ०.६५ |
| ३ | वर्सोवा | ५.०० |
| ४ | वरळी | १.६० |
| ५ | ट्रॉम्बे | ७.०० |
| ६ | माहुल | २.०० |
| | एकूण | १९.९० |

| **जिल्हा:रायगड** | | |
|---|---|---|
| १ | कोंडरी पाडा | ०.६० |
| २ | थळ | ०.५० |
| ३ | वर्सोली | ०.६० |
| ४ | चाळमाळा | ०.५० |
| ५ | बोर्ली मांडला | ०.६० |
| ६ | कोर्लाई | ०.६५ |
| ७ | मुरुड | ०.५० |
| | एकूण | ३.९५ |

| **जिल्हा:रत्नागिरी** | | |
|---|---|---|
| १ | जाकीमिऱ्या | २.५० |
| २ | बुरोंडी | ४.४५ |
| ३ | वरोडा | ०.६० |
| ४ | काळबादेवी | ०.९० |
| ५ | साखरी आगार | ४.३५ |
| | एकूण | १२.८० |

| **जिल्हा:सिंधुदुर्ग** | | |
|---|---|---|
| १ | तांबळडेग | १.५० |
| २ | वायरी | २.०० |
| ३ | मकरेबाग (दांडी) | ३.१५ |
| ४ | निवती मेढा | १.३० |
| ५ | सर्जेकोट | ६.०० |

| | | |
|---|---|---|
| ६ | वेंगुर्ला | १.५० |
| | एकूण | १५.४५ |
| एकूण ३० | | एकूण ७०.०० |

उपरोक्त नमूद केलेल्या ३० ठिकाणी केंद्र शासनाच्या अर्थसहाय्य योजनेंतर्गत मासेमारी जेट्टीचे बांधकामांचा अंदाजित खर्च नमूद करण्यात आलेला आहे. तो संभावित खर्च आहे. त्यात भविष्यात बदल होण्याची शक्यता आहे. या सर्व बांधकामांच्या प्रशासकीय मान्यतेसाठीच्या प्रस्तावास स्वतंत्रपणे नियोजन विभागाची मान्यता घेण्यात येईल.

सदर कामांसाठी निधी उपलब्ध झाल्याशिवाय खर्च करण्यात येवू नये. तसेच यासाठी येणारा खर्च खालील लेखाशिर्षाखाली उपलब्ध करुन देण्यात येईलः-

४४०५-मत्स्यव्यवसायावरील भांडवली खर्च
(२) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, -
१०३-सागरी मत्स्यव्यवसाय -
(२)(१) लहान मासेमारी बंदरे -
(बी) राज्य योजनांतर्गत योजना -

प्रस्तुत ३० ठिकाणी मासे उतरविण्याकरिता जेट्टी,लिलावगृह,मासे सुविण्याचा ओटा, स्वच्छतागृह इ.मूलभूत सुविधा उपलब्ध करण्याची बांधकामे सन २००९-१० ते २०११-१२ पर्यंतच्या चार वर्षाच्या कालावधीत पूर्ण करावीत. यासाठी आवश्यक असलेली तरतूद मत्स्यव्यवसाय विभागामार्फत करण्यात येईल.

सदर कामांसाठी किनारी अभियंता यांचेकडे असलेल्या यंत्रणेपैकी गरजेप्रमाणे काही यंत्रणा महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडे वर्ग करण्यात यावी. बंदरे तसेच जेट्टीचे आराखडे/अंदाजपत्रके आवश्यक सर्व बांधकामापूर्व अभ्यास अहवाल,पर्यावरणविषयक अभ्यास अहवाल इत्यादी कामे महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांच्यामार्फत करण्यात यावीत.

वरील कामासाठी सेंटेज चार्जेस महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांना देण्यात येतील, याबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

हे आदेश नियोजन विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

महराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(ज.ल.पावरा),
उपसचिव,महाराष्ट्र शासन
कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,

प्रति,

आयुक्त,मत्स्यव्यवसाय,महाराष्ट्र राज्य,मुंबई-५१.(५ प्रती)
मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई -
उपसंचालक (सागरी), आयुक्त मत्स्यव्यवसाय यांचे कार्यालय,मुंबई -
प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय,कोकण भवन,बांद्रा (पूर्व),मुंबई
किनारी अभियंता,बी.पी.टी.प्रशासकीय इमारत,मुंबई -
पत्तन अभियंता,कोकण भवन,मुंबई -
सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय,मुंबई/ठाणे/अलिबाग/रत्नागिरी/सिंधुदुर्ग
महालेखापाल,महाराष्ट्र-१/२(लेखा परिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता),मुंबई/नागपूर
जिल्हा कोषागार अधिकारी,ठाणे/रायगड (अलिबाग)/रत्नागिरी/सिंधुदुर्ग
अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई
गृह विभाग (बंदरे),मंत्रालय,मुंबई
सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.
नियोजन विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.
वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.
कक्ष अधिकारी,(पदुम-१६),कृषि व पदुम विभाग,मंत्रालय,मुंबई
निवडनस्ती.